गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक २७२ वा ● गुरुवार २२ फेब्रुवारी २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 272 | Date : 22/02/2024 blow :Thursday Page 4 Price 4

शेतकरी आंदोलकाचा मृत्यू
हिंसाचारात १२ पोलीस जखमी

नवी दिल्ली : दिल्लीच्या सीमेवरील पंजाब-हरियाणाच्या शेतकऱ्यांचे आंदोलन बुधवारी आणखी चिघळले. खनौरी येथे झालेल्या हिंसाचारात एका तरुण आंदोलकाचा मृत्यू झाला तर १२ पोलीस जखमी झाले आहेत. सीमा ओलांडण्याचा प्रयत्न करणाऱ्या आंदोलकांना पोलिसांनी रोखण्याचा प्रयत्न केल्यानंतर हिंसाचार उफाळला. आंदोलकांना रोखण्यासाठी हरियाणा पोलिसांनी अश्रुधुराचा मारा केला, तर आंदोलकांनी मिरचीची पूड जाळल्यामुळे अनेक पोलिसांना त्रास झाल्याचा दावा अधिकाऱ्यांनी केला.

रविवारी रात्री सरकारबरोबर चर्चेची चौथी फेरी निष्फळ ठरल्यानंतर बुधवारी शेतकरी संघटनांनी पुन्हा एकदा 'चलो दिल्ली' आंदोलनाची हाक दिली होती. त्यानुसार सकाळी ट्रॅक्टर, उत्खनक, ट्रक अशा वाहनांसह शंभू, खनौरी आदी सीमांवर तळ ठोकलेल्या शेतकऱ्यांनी दिल्लीच्या दिशेने कूच केले. दिल्ली पोलिसांनी उभारलेली तटबंदी मोडून आंदोलकांनी राजधानीत शिरण्याचा प्रयत्न केला. त्यांना रोखण्यासाठी खनौरी सीमेवर हरियाणा पोलिसांनी मोठ्या प्रमाणात अश्रुधुराचा मारा केला, तसेच रबरी गोळ्यांच्या फैरीही झाडण्यात आल्या. आंदोलक आणि पोलिसांमध्ये चकमकही झाली. यात सुभकरण सिंग (२१) या तरुणाचा मृत्यू झाला. तो पंजाबच्या भटिंडा जिल्ह्यातील बलोक गावचा रहिवासी होता. शेतकरी नेते बलदेव सिंग सिरसा यांनी याला दुजरो दिला आहे. १३ फेब्रुवारीला 'दिल्ली चलो' आंदोलन सुरू झाल्यानंतरचा । पान २ वर

'महाराष्ट्र भूषण' पुरस्काराचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आज वितरण

मुंबई : महाराष्ट्र शासनाकडून दिला जाणारा राज्याचा सर्वोच्च नागरी सन्मान असणारा 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार, येत्या गुरूवारी, दि. २२ फेब्रुवारी रोजी ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. तर मानाचा गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार ज्येष्ठ पार्श्वगायक सुरेश वाडकर यांना प्रदान करण्यात येणार आहे. याशिवाय, मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीसाठी आपल्या कलेच्या माध्यमातून अनेक वर्ष योगदान देत रसिकांची व कलासृष्टीची सेवा करणाऱ्या ज्येष्ठ कलावंतांना दिला जाणारा राजकपूर जीवनगौरव आणि विशेष योगदान पुरस्कार, चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव आणि विशेष योगदान पुरस्कारही यावेळी प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली.

वरळी येथील डोम, एनएससीआय

(नॅशनल स्पोर्टस क्लब ऑफ इंडिया) येथे गुरुवारी सायंकाळी ६.३० वाजता होणाऱ्या ५७ व्या राज्य चित्रपट पुरस्कार सोहळ्यात हे पुरस्कार मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते सन्मानपूर्वक प्रदान करण्यात करण्यात येतील. या समारंभास केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयूष गोयल, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. तर, विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर, विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार, शालेय शिक्षण मंत्री तथा मुंबई शहर पालकमंत्री दीपक केसरकर, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री तथा मुंबई शहर उपनगर पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. या कार्यक्रमास स्थानिक लोकप्रतिनिधीही उपस्थित राहणार आहेत.

। पान २ वर

'बीनाका'चे बहारदार निवेदक अमीन सयानी यांचे निधन

मुंबई : ज्येष्ठ निवेदक अमीन सयानी यांचे मंगळवारी रात्री रुग्णालयात निधन झाले. ते ९१ वर्षांचे होते. सयानी यांना मंगळवारी रात्री हृदयविकाराचा झटका आला. त्यांना तातडीने एच.एन. रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र तिथेच त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्यावर गुरुवारी अंतिम संस्कार करण्यात येणार आहेत. अमीन यांनी 'बहनों और भाईयो, अगली पायदानपें है ये गाना' असे म्हणत अनेक वर्षे रेडिओवर बीनाका गीतमाला सादर केली. शैलीदार आणि रसाळ निवेदनाने ते संगीतप्रेमींच्या गळ्यातील ताईत बनले. अमीन सयानी यांनी केवळ निवेदन केले नाही तर अनेक गायक, गीतकार संगीतकार यांना मुलाखतीच्या निमित्ताने बोलते करून त्यांच्या गाण्यांचा सृजनशील प्रवास ध्वनिमुद्रित केला.

जरांगे-पाटील यांची राज्यव्यापी 'रास्ता रोको'ची हाक

जालना : मराठा आरक्षणासाठी आंदोलन शांततेत सुरू राहील, असे स्पष्ट करत दररोज दोन टप्प्यात रास्ता रोको आंदोलन होईल. रविवारपासून राज्यव्यापी रास्ता रोको आंदोलन केले जाईल, अशी माहिती मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगेपाटील यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. या पुढील मराठा आरक्षणासाठी केलेले आंदोलन हे देशातील सर्वात मोठे आंदोलन असेल. ३ मार्च रोजी राज्यातील सर्व जिल्ह्यात एकाचवेळी रास्ता रोको आंदोलन केले जाईल. यानंतर मुंबईत होणाऱ्या आंदोलनाची दिशा स्पष्ट केली जाईल, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. यावेळी जरांगे म्हणाले, मराठा राजकीय नेत्यांनी आमच्या दारासमोर येऊ नये. नेता आपल्या दारी आला तर दार लावा. आता आपण आपली ताकद दाखवून द्यायची आहे. नेत्यांना गावबंदी नाही, असे सांगत मराठा आरक्षण मिळेपर्यंत निवडणुका घेऊ नका, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

दररोज रास्ता रोको आंदोलन करून सरकारला जिल्हा प्रशासनातील अधिकाऱ्यांना निवेदन द्यावे. यापुढे राज्यभर आंदोलन रस्त्यावर उतरून होईल. हे आंदोलन होताना कोणाला त्रास होणार नाही, याची काळजी घ्यावी. रास्ता रोको आंदोलन येत्या २४ फेब्रुवारीपासून रोज सकाळी १०.३० ते दुपारी १ दरम्यान करायचे आहे. ज्यांना ही वेळ जमत नसेल त्यांनी दुपारी ४ ते सायंकाळी ७ पर्यंत करावे.

मराठा आरक्षण मिळेपर्यंत निवडणुका घेऊ नका. निवडणूक घेतल्यास प्रचाराला आलेल्या गाड्या ताब्यात घ्या. आंदोलन करत असताना। पान २ वर

महागड्या गाड्या, घड्याळे वापरू नका
भाजप अध्यक्ष नड्डा यांची सूचना

मुंबई : भाजपचे नेते, पदाधिकारी आणि आमदार-खासदारांनी निवडणूक प्रचार काळात जनसामान्यांमध्ये मिसळताना आणि झोपडपट्ट्यांमध्ये फिरताना महागड्या गाड्या व राडोसारखी महागडी घड्याळे आदी न वापरता साधी राहणी ठेवण्याच्या सूचना भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा यांनी पक्षाच्या मुंबईतील नेते व पदाधिकाऱ्यांना दिल्या. मुंबईत महायुतीच्या सहाही उमेदवारांच्या विजयासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

नड्डा हे दोन दिवस मुंबई दौऱ्यावर असून त्यांनी शहरातील सहा लोकसभा मतदारसंघांच्या निवडणूक व्यवस्थापन समितीची दुसरी बैठक घेतली. त्यास व्यवस्थापन समितीत असलेल्या वेगवेगळ्या ३६ विभागाचे प्रमुख, भाजपचे सर्व आमदार व खासदार उपस्थित होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काही महिन्यांपूर्वी झालेल्या राष्ट्रीय अधिवेशनातच सर्व पदाधिकारी व नेत्यांना साधी राहणीमान ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. विरोधकांनी केलेले आरोप लगेच खोडून काढून त्यांना। पान २ वर

तीन ते चार दिवसात दुधनीकरांना पाण्याचे सोय करणार : आतीश वाळुंज

अक्कलकोट/प्रतिनिधी: अक्कलकोट तालुक्यातील दुधनी येथील नगर परिषदेच्या वतीने येत्या तीन ते चार दिवसात नागरिकांसाठी पिण्याचे पाण्याची सोय केली जाईल असे आश्र्वासन मुख्याधिकारी आतील वाळूंज यांनी दिली आहे.

दुधनी नगर परिषदेत रयतेचे राजा,महाराष्ट्राचे कुलदैवत शिवाजी महाराज यांच्या जयंती करुन मुख्याधिकारी दालनात रिपब्लिकन पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी यांच्या सहीत ग्रामस्थ बसले असता पाण्याचे चर्चा चालु असतांना एका प्रश्र्नाला उत्तर देतांना म्हणाले की,गावात एकूण सहा बोअरवेल मारले असून लगेच सोय करण्यात येणार असल्याचे सांगितले आहे.

याप्रसंगी मुख्याधिकारी आतील वाळूंज,रिपाइं (आठवले गट) चे जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी,शहर अध्यक्ष गोरखनाथ धोडमनी, पत्रकार तथा रिपाइं प्रसिध्दी प्रमुख निंगराज निंबाळ, रिपाइं मुस्लिम आघाडी शहर अध्यक्ष महेदीमिंया जिडगे,मुकादम मौलप्पा गायकवाड,सेवा निवृत्त कर्मचारी गुंडप्पा परमशेट्टी,पाटील सह इतर कर्मचारी आणी नागरीक उपस्थित होते.

लवकरात लवकर पाण्याचे नियोजन करण्यात यावे नागरिक पाण्यासाठी वणवण वण फिरता येते हे बंद झाले पाहीजे याची काळजी घ्यावी. असे सैदप्पा झळकी यांनी मागणी केली.

'सप'काँग्रेस आघाडीवर शिक्कामोर्तब ; उत्तर प्रदेशात काँग्रेस १७ जागांवर लढणार

नवी दिल्ली: 'इंडिया' आघाडीतील जागावाटपाने पुन्हा वेग घेतला असून उत्तर प्रदेशमध्येही काँग्रेस व समाजवादी काँग्रेस या दोन्ही घटक पक्षांनी जागावाटपांवर बुधवारी शिक्कामोर्तब केले. या शिवाय, बिहार, तामीळनाडू, दिल्ली या राज्यांमध्येही जागावाटपांवर चर्चा केली जात आहे.

नव्या सूत्रानुसार ८० जागांपैकी 'सप' ६२ तर, काँग्रेस १७ जागा लढवू शकेल. एक जागा चंद्रशेखर आझाद यांच्या 'आझाद समाज पक्षा'ला दिली जाईल. मुरादाबाद मतदारसंघाचा आग्रह काँग्रेसने तर, वाराणसीचा आग्रह 'सप'ने सोडून दिला आहे. रायबरेली, अमेठी, वाराणसी, कानपूर, मथुरा, झांसी आदी जागा काँग्रेस लढवणार आहे.दिल्लीतील ७ जागांसाठी 'आप'चे प्रमुख अरविंद केजरीवाल व काँग्रेसचे पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्यामध्ये चर्चा झाली होती. दिल्लीत तरी भाजपविरोधात एकत्र येणाचा निर्णय घेण्यात आला होता. काँग्रेसने ४ जागांची मागणी केल्यामुळे बुधवारी जागावाटपांच्या वाटाघाटींमध्ये अडथळा निर्माण झाला. मात्र, दोन्ही पक्षांच्या वरिष्ठ नेत्यांच्या स्तरावर सामंजस्य घडवून आणले जाण्याची शक्यता आहे. पंजाबमध्ये भाजपचे अस्तित्व नगण्य असल्यामुळे 'आप' व काँग्रेसने युती न करता सर्वच्या सर्व १३ जागांवर स्वतंत्रपणे लढण्याचा निर्णय घेतला आहे. बिहारमध्ये नितीशकुमार 'इंडिया'तून बाहेर

पडल्यामुळे महाआघाडीतील राष्ट्रीय जनता दल व काँग्रेसमध्ये जागावाटपाच्या नव्या सूत्रांवर चर्चा केली जात आहे. बिहारमधील ४० जागांपैकी २७-२८ जागा राष्ट्रीय जनता दल, काँग्रेस ७-८ जागा व डाव्या पक्षांना ४ जाग दिल्या जाऊ शकतात.

तामिळनाडूमध्ये ३९ जागांपैकी सत्ताधारी 'द्रमुक'ने काँग्रेसला ७ जागा देऊ केल्या असल्या तरी काँग्रेसने १६ जागांची मागणी केली आहे. राहुल गांधी वा सोनिया गांधी यांनी 'द्रमुक'चे प्रमुख स्टॅलिन यांच्याशी संवाद साधला तर काँग्रेसला सातपेक्षा जास्त जागा दिल्या जाऊ शकतात. द्रमुक-काँग्रेस आघाडीमध्ये कमल हासन हे देखील सहभागी होण्याची शक्यता असून त्यांना लोकसभा निवडणुकीत उतरवले जाऊ शकते वा राज्यसभेचे सदस्यही दिले जाऊ शकते. प.बंगालमध्ये ४२ जागांपैकी तृणमूल काँग्रेसने काँग्रेसला फक्त दोन जागा दिल्या असल्यामुळे इथे दोन्ही पक्षांमध्ये जागावाटपांबाबत तडजोड होण्याची शक्यता नाही.

महाराष्ट्र बहुजन मध्यवर्ती शिवजन्मोत्सव युवक मंडळ शिव छत्रपतींच्या भव्य मिरवणूक
अमोलराजे भोसले मित्र मंडळाचे ३०० युवकांच्या लेझीम पथकाचा खेळ लक्षवेधी ठरले..!

अक्कलकोट/प्रतिनिधी: श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ आणि महाराष्ट्र बहुजन मध्यवर्ती शिवजन्मोत्सव युवक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आधारस्तंभ जन्मेजयराजे भोसले, श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानाचे अध्यक्ष महेश इंगळे व मंडळाचे सुरेशचंद्र सूर्यवंशी, शामराव मोरे, बाबासाहेब निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली व अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली संयोजक अमोलराजे भोसले मित्र मंडळ यांच्या वतीने बुधवारी शिव छत्रपतींच्या भव्य मिरवणूकीने जय भवानी...! जय शिवराय...!! च्या जयघोषात शिवजन्मोत्सवाची सांगता करण्यात आली. या मिरवणुकीत अमोलराजे भोसले मित्र मंडळाचे ३०० युवकांच्या लेझीम पथकाचा खेळ लक्षवेधी ठरले..!

बुधवारी सायंकाळी ६ वा. शिव छत्रपतींची भव्य मिरवणूक आमदार सचिन कल्याणशेट्टी, माजी गृह राज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे, शिंदे गटाचे सोलापूर जिल्हा प्रमुख अमोल (बापू) शिंदे, उपविभागीय पोलीस अधिकारी विलासराव यामावार, सो.म.पा.माजी उपमहापौर दिलीप (भाऊ) कोल्हे, सामाजिक कार्यकर्ते श्रीकांत घाडगे, माजी शिक्षण सभापती संकेत पिसे,

उत्तर पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे, दक्षिण पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक महेश स्वामी, वळसंग पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक अनिल सनगले, पं.स.गट विकास अधिकारी सचिन खुडे, गट शिक्षणाधिकारी प्रशांत अरबाळे यांच्या हस्ते मिरवणुकीस प्रारंभ करण्यात आला. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

सदराची मिरवणूक शहरातील प्रमुख मार्गावरील जुना राजवाडा, नेहरू गल्ली, श्री कमलाराजे चौक, ए-वन चौक, नवीन राजवाडा मार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौक (बस स्थानक), विजय चौक, तारामाता चौक, कारंजा चौक, मेन रोड, वीर सावरकर चौक, सेन्ट्रल चौक मार्गे समर्थ चौक ते राजे फत्तेसिंह चौक सर्जेराव जाधव पथ येथे मिरवणुकीची सांगता करण्यात आली.

या मिरवणुकीस राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष दिलीप सिद्धे (ना.अजितदादा गट), माजी विरोधी पक्ष नेते अशपाकभाई बळोरगी, शिंदे गटाचे शिवसेना तालुका प्रमुख संजय देशमुख, माजी नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी, अन्नछत्र मंडळाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, अन्नछत्र मंडळाचे विश्र्वस्त भाऊ कापसे, संतोष भोसले, लाला राठोड, जेष्ठ नेते सोपनराव गोंडाळ, विधिज्ञ अँड.संतोष खोबरे, मुस्लीम समाज संघटनाचे अध्यक्ष एजाज मुतवल्ली, माजी नगरसेवक उत्तम गायकवाड, रासप पश्र्चिम महाराष्ट्र अध्यक्ष सुनिल बंडगर, आरपीआय तालुकाध्यक्ष अविनाश मडीखांबे, राज शिंदे, अभिनंदन गांधी, अँड. विजय हर्डीकर, अँड. लखन गायकवाड, डॉ.आर.व्ही.पाटील, लेखापरीक्षक ओंकारेश्र्वर उटगे, अविराज शिद्धे, सिद्धेश्र्वर मोरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर अध्यक्ष (ना.अजितदादा गट) शिवराज स्वामी, डॉ.विनायक बुधले, सुभाष पुजारी, माजी नगरसेवक सद्दाम शेरीकर, मैनुद्दीन कोरबू, शकील पठाण, नन्नु कोरबू, दीपक जरीपटके, सुनिल खवळे, अंकुश चौगुले, पिंटू सोनटक्के, भाजपा शहर सरचिटणीस बाळासाहेब शिंदे, सिध्दाराम टाके, बालाजी पाटील, ऋषी लोणारी, शिंदे गटाचे शहर प्रमुख योगेश पवार, राम मातोळे, अभियंता किरण पाटील, अमित थोरात, अरविंद शिंदे, पै.मौला शेख, पै.महेश कुलकर्णी, छत्रपती प्रतिष्ठानचे गणेश गोब्बुर, सर्फराज शेख, मनोज इंगोले, लखन झंपले यांच्या प्रमुख उपस्थितीत शहरातील प्रमुख मार्गावरून मिरवणूक संपन्न झाली. निघालेल्या मिरवणुकीचे विविध सामाजिक संघटना व पक्षाने स्वागत केले. मिरवणूक यशस्वीसाठी अमोलराजे भोसले मित्र मंडळाच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

मिरवणुकीत सामील होणाऱ्या शिवभक्तांना निकम बंधू यांचे हॉटेल राज प्रिया कडून अल्पोपहार देण्यात आला. मुस्लीम समाजाकडून कारंजा चौक येथे सुगंधी दुध वाटप करण्यात आले. नाईकवाडी गल्ली यंग कमिटीकडून छत्रपती शिवाजी महाराजांना पुष्पहार अर्पण करण्यात आले.

संपादकीय

भाजपचा हा सुवर्णकाळ..

भाजपकडे येणाऱ्यांची रांग वाढत चालली आहे. २०२४ ची निवडणूक भाजपच्या व पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या दृष्टीने प्रतिष्ठेची आहे. 'अबकी बार चार सौ पार' अशी घोषणा भाजपने दिली आहे. म्हणूनच भाजपची विचारधारा व मोदींचे नेतृत्व मान्य आहे, त्यांच्यासाठी पक्षाने दरवाजे खुले ठेवले आहेत. येत्या लोकसभा निवडणुकीत मोदी की गॅरंटी आणि राम मंदिर हे मुद्दे भाजपच्या प्रचारात आघाडीवर असतील. महाराष्ट्रातून एकनाथ शिंदे, अजित पवार आणि आता अशोक चव्हाण, उत्तर प्रदेशमधून जयंत चौधरी, बिहारमधून नितीश कुमार एनडीएच्या तंबूत येऊन दाखल झाले आहेत. आंध्र प्रदेशचे माजी मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू, वायएसआर काँग्रेसचे जगन मोहन रेड्डी आणि पंजाबमधील अकाली दलाचे नेतेही भाजप श्रेष्ठींच्या संपर्कात आहेत. मोदी हे पंतप्रधानपदाची हॅट्ट्रिक करणार व त्यांच्या नेतृत्वाखाली केंद्रात सलग तिसऱ्यांदा एनडीएचे सरकार येणार असे देशात वातावरण आहे. दुसरीकडे भाजपविरोधी इंडिया आघाडीची रोज शकले पडत आहेत. म्हणूनच भविष्याचा विचार करून भाजपकडे येणाऱ्यांची गर्दी वाढत चालली आहे. दिवंगत पंतप्रधान चौधरी चरणसिंह यांना भारतरत्न जाहीर झाल्यावर त्यांचे नातू जयंत चौधरी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींविषयी कृतज्ञता व्यक्त केली. त्यांनीही लगेचच एनडीएकडे वाटचाल सुरू केली. पश्चिमी उत्तर प्रदेशात लोकसभेच्या २७ जागा असून १८ टक्के लोकसंख्या जाट आहे. चौदा मतदारसंघात जाटांचा प्रभाव आहे. राष्ट्रीय लोकदलामुळे या सर्व जागा भाजप-एनडीएला मिळू शकतील, असे गणित आहे. आंध्र प्रदेशात तेलुगू देसम व वायएसआर काँग्रेस हे दोन्ही पक्ष एनडीएमध्ये येण्यास उत्सुक आहेत. चंद्राबाबू नायडू व वायएस जगन मोहन रेड्डी हे भाजप श्रेष्ठींच्या संपर्कात आहेत. राम मंदिरात रामलल्लाची प्राणप्रतिष्ठा झाल्यापासून भाजपचा उत्साह गगनाला जाऊन भिडला आहे. दुसरीकडे खासदार राहुल गांधींची भारत जोडो यात्रा चालू असूनही काँग्रेसमध्ये नैराश्य आहे. काँग्रेसमधील दिग्गज नेते पाठोपाठ बाहेर पडून भाजपच्या छावणीत सामील होत आहेत. जम्मू-काश्मीरला स्वतंत्र दर्जा देणारे ३७० कलमाचे कवच मोदी सरकारने काढून घेतल्यामुळे व अयोध्येतील राम मंदिरामुळे विरोधी पक्षातील अनेक दिग्गज नेते भाजपकडे आकर्षित होत आहेत. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा व भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या नेतृत्वाखाली सर्वाधिक वेगाने वाढणारा पक्ष म्हणून भाजपचा हा सुवर्णकाळ आहे.

पान १ वरुन

शेतकरी आंदोलकाचा मृत्यू ..

हा पहिला बळी आहे. पटियालास्थित राजिंद्र रुग्णालयाचे वैद्याकीय अधिष्ठाता एच. एस. रेखी यांनी दिलेल्या माहितीनुसार सुभकरण याच्या डोक्याला इजा झाल्याने त्याचा मृत्यू झाला असण्याची शक्यता आहे. अन्य दोघे जखमी असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती रेखी यांनी दिली.

शेतकरी आंदोलनाच्या निमित्ताने 'आप'ची सत्ता असलेला पंजाब आणि भाजपशासित हरियाणा या दोन राज्यांमधील वाद पुन्हा उफाळून आला आहे. हरियाणा पोलिसांनी पंजाबच्या हद्दीत येऊन कारवाई केल्याचा आरोप अकाली दलाचे अध्यक्ष सुखबीरसिंग बादल यांनी केला आहे. आंदोलकाच्या मृत्यूवरून पंजाबमधील भाजपेतर पक्षांनी हरियाणा पोलिसांवर टीकेची झोड उठविली. दुसरीकडे आंदोलकांकडे असलेले ट्रॅक्टर, उत्खनक आदी साहित्य जप्त करण्याची विनंती मंगळवारी पंजाब पोलिसांना केली होती. मात्र त्याकडे दुर्लक्ष केले गेले, असा दावा हरियाणा पोलिसांनी केला.

खनौरी सीमेवर उफाळलेल्या हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर शेतकरी नेते सरवनसिंग पांढेर यांनी आंदोलन दोन दिवसांसाठी स्थगित करीत असल्याची घोषणा केली. शुक्रवारी संध्याकाळी आंदोलनाची दिशा निश्चित केली जाईल, असे त्यांनी बुधवारी रात्री उशिरा जाहीर केले. तर शंभू सीमेवर आंदोलकांना संबोधित करताना शेतकरी नेते जगजितसिंग दालेवाल यांनीही शांततेत आंदोलन करण्याचे आवाहन केले.

'महाराष्ट्र भूषण' पुरस्काराचे मुख्यमंत्री

ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांना

२०२३ साठीचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर झाला आहे. राजकपूर जीवनगौरव पुरस्कार सन २०२० साठी ज्येष्ठ अभिनेत्री श्रीमती अरुणा इराणी, सन २०२१ साठी ज्येष्ठ अभिनेते मिथुन चक्रवर्ती आणि सन २०२२ साठी ज्येष्ठ अभिनेत्री श्रीमती हेलन यांना जाहीर झाला आहे तर राजकपूर विशेष योगदान पुरस्कार सन २०२० साठी ज्येष्ठ दिग्दर्शक जे. पी. दत्ता, सन २०२१ साठी ख्यातनाम गायक सोनू निगम आणि सन २०२२ साठी विधू विनोद चोप्रा यांना जाहीर झाला आहे. या समारंभात त्यांना सन्मानपूर्वक हे पुरस्कार प्रदान केले जातील.ज्येष्ठ कलावंतांना दिला जाणारा चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार सन २०२० साठी ख्यातनाम चित्रपट अभिनेते स्व. रविंद्र महाजनी (मरणोत्तर), सन २०२१ साठी ज्येष्ठ अभिनेत्री श्रीमती उषा चव्हाण आणि सन २०२२ साठी ज्येष्ठ अभिनेत्री श्रीमती उषा नाईक यांना जाहीर झाला आहे. यासोबतच चित्रपती व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्कार सन २०२० साठी चित्रपट दिग्दर्शक गजेंद्र अहिरे, सन २०२१ साठी ज्येष्ठ पार्श्वगायक रवींद्र साठे आणि सन २०२२ साठी प्रसिद्ध चित्रपट अभिनेते-दिग्दर्शक नागराज मंजुळे यांना जाहीर झाला आहे. या राज्य चित्रपट पुरस्कार सोहळ्याच्या समारंभात हे पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत.

या पुरस्कार सोहळ्यासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव तथा सांस्कृतिक कार्य विभागाचे प्रधान सचिव विकास खारगे, महाराष्ट्र राज्य चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ.अविनाश ढाकणे आणि सांस्कृतिक कार्य संचालक बिभीषण चवरे यांनी केले आहे.

जरांगे-पाटील यांची राज्यव्यापी

लोकशाही, कायदा, आचारसंहिता भंग होणार नाही याची काळजी घ्या. आंदोलनाला बसताना एका रांगेत सर्वांनी उपोषणालाबसावे. आंदोलन करत असताना कोणाचे बरे-वाईट झाल्यास त्याला देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे जबाबदार राहतील, असेही ते म्हणाले.

महागड्या गाड्या, घड्याळे

प्रत्युत्तर देण्यात यावे.

केंद्र व राज्य सरकारच्या योजना आणि केलेली कामे जनतेपर्यंत प्रभावी पद्धतीने पोचविण्यात यावीत. नवीन मतदारांची नोंदणी मोठ्या प्रमाणावर झाली असून त्यांना भाजपकडे आकर्षित करण्यासाठी भेटी घेऊन प्रयत्न करावेत, अशा सूचना नड्डा यांनी पदाधिकाऱ्यांना केल्या. त्याचबरोबर स्थानिक जनतेचे प्रश्न व महत्वाचे मुद्दे नेत्यांनी सरकारपुढे उपस्थित करावेत आणि जे प्रश्न सोडवायचे राहिले असतील, तेही मार्गी लावावेत, अशा सूचना नड्डा यांनी केल्या.

निवडणूक प्रचार तयारी, नेत्यांच्या दौऱ्यांची आखणी, समाजमाध्यमांचा प्रभावी वापर आणि अन्य मुद्द्यांवर नड्डा यांनी दोन स्वतंत्र बैठकांमध्ये तयारीचा आढावा घेतला.

लक्षद्विप मधील दिव्यांगजनांना केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते मोफत सहाय्यक उपकरणांचे वाटप

मुंबई : सामाजिक न्याय मंत्रालयाच्या वतीने लक्षद्विप मधील दिव्यांगजनांसाठी सामाजिक अधिकारिता शिबीराचे आयोजन केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले याच्या नेतृत्वात करण्यात आाले होते. या सामाजिक अधिकारीता शिबीरात दिव्यांगजन आणि जेष्ठ नागरिकांना विविध सहाय्यक उपकरणांचे मोफत वाटप केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांच्या हस्ते आज येथील कवरती येथे करण्यात आले.यावेळी लक्षद्विपचे जिल्हाधिकारी अर्जुन मोहन लक्षद्विपचे प्रशासक पटेल यांचे सल्लागार संदिप कुमार आदी मान्यवर उपस्थित होते तसेच अलिमको चे अधिकारी अशोक कुमार पाल, सामाजिक न्याय विभागाचे संचालक तन्वीर अहमद हे सुद्धा मंचावर उपस्थित होते.

सामजिक न्याय मंत्रालयाच्या अंर्तगत दिव्यांगजन,जेष्ठ नागरिक,तृतीयपंथी,ओबीसी आणि अनूसुचित जाती असे समाजातील घटक येतात.त्यामुळे माझ्या सामाजिक न्याय मंत्रालयाच्या अंर्तगत देशभरातील ८५ टक्के लोकसंख्या अंर्तभूत होते अशी माहीती यावेळी ना.रामदास आठवले यांनी दिली.

लक्षद्विप मध्ये एकुण २७ बेट (आयलँड) आहेत.त्यातील १० बेटावरच लोकवस्ती आहे.लक्षद्विपची एकुण लोकसंख्या ७० हजार आहे.प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देशभरात गरिब कल्याण अन्न योजना सुरु असून त्या योजने द्वारे लक्षद्विप मध्ये मोठ्या प्रमाणात मोफत अन्न धान्य वितरीत केले जात आहे.संपूर्ण लक्षद्विप समुद्रात आणी बेटांमध्ये आहे.प्रवासासाठी रस्ते वाहतुक नाही.बोटीं द्वारे प्रवास करावा लागतो.त्यामुळे येथील प्रवासी बोटीची संख्या वाढवण्यासाठी आपण प्रयत्न करणार आहोत.तसेच लक्षद्विपचे आगत्ती विमानतळ आहे.ते मोठे करणे आवश्यक आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी त्याबाबत सुचना दिल्या आहेत.लक्षद्विपच्या विमानतळाचा विकास आणि विमान वाहतुक वाढवण्यासाठी आपण केंद्रिय हवाई वाहतुक मंत्री जोतीरादित्य सिंधिया यांची भेटे घेणार असल्याचे ना. रामदास आठवले यांनी यावेळी सागितले. लक्षद्विप हे मालदिव पेक्षा अधिक पटीने सुदंर आहे.त्यामुळे भारतीय पर्यटकांनी लक्षद्विपला अवश्य भेट द्यावी असे ना.रामदास आठवले यांनी केले. लक्षद्वीप दौऱ्यात ना.रामदास आठवले यांनी त्यांच्या पत्नी सौ सीमाताई आठवले; पुत्र जित आठवले यांच्या समवेत येथील अनेक स्थळांना ; समुद्रतटांना आणि येथील संग्रहालयाला भेट दिली.

श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्यावर मागे यात्रेनिमित्त भाविकांना फराळ वाटप

पंढरपूर/राजेंद्र कोरके पाटीलः तालुका पंढरपूर येथील श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना येथे कारखान्याचे चेअरमन श्री अभिजीत धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मागे यात्रेनिमित्त भाविकांसाठी फराळ वाटपाचे नियोजन करण्यात आले

मंगळवार दिनांक २०/०२/२०२४ रोजी माघवारी (जय एकादशी) अवचित साधून कारखान्याच्या मेन गेट जवळ श्रीक्षेत्र पंढरपूर येथे येणाऱ्या भावी भक्तांना कारखान्याच्या वतीने खिचडी व केळीचे वाटप धाराशिव कारखान्याचे कार्यकारी संचालक श्री अमर पाटील व श्री विठ्ठल कारखान्याचे संचालक सर्वश्री दिनकर चव्हाण संभाजी भोसले कालिदास पाटील बाळासाहेब हाके नवनाथ नाईक नवरे जनक भोसले सचिन वाघाटे अशोक तोडले दशरथ जाधव चिखलकर आधी संचालक व कारखान्याचे प्र कार्यकारी संचालक डी आर गायकवाड त्यांच्या सहकारखान्याचे अधिकारी कर्मचारी यांच्या शुभहस्ते वाटप करण्यात आले श्री विठ्ठल कारखान्याच्या वतीने एकादशी निमित्त भाविक भक्तांना फराळ वाटपाची परंपरा चालू ठेवल्यामुळे कारखान्यांना कार्यक्षेत्रातील व नगर बीड करमाळा टेंभुर्णी या भागातून येणाऱ्या भाविक भक्तांनी फराळीचा आस्वाद घेऊन कारखान्याचे संचालक मंडळ व अधिकारी कर्मचारी यांचे कौतुक केले

मा.उच्च न्यायालयाच्या स्थगिती आदेशानंतरही शेलार ग्राम पंचायत निवडणूकीचा घाट

प्रशासकीय अधिकारी आमदार खासदारांच्या दबावाखाली काम करत असल्याचा सरपंचांचा आरोप

भिवंडी : शहरा लगत असलेल्या शेलार ग्राम पंचायतीच्या काही सदस्यांनी सदस्य पदाचा राजीनामा दिल्या नंतर त्या जागी फेर निवडणूक कार्यक्रम घेण्या ऐवजी थेट ग्राम पंचायत कार्यकारणी बरखास्त करून निवडणूक घेण्याचा घाट घातला जात असून ग्राम पंचायतीच्या सदस्यांनी दिलेला राजीनामा बेकायदेशीर असून त्याविरोधात मा.उच्च न्यायालयाने स्थगिती आदेश दिले असून व प्रकरण न्यायप्रविष्ठ असतांना, केवळ सरपंच पद अनुसूचित जातीसाठी राखीव असल्यानेच सत्ताधारी आमदार खासदार प्रशासकीय अधिकाऱ्यांवर दबाव टाकून निवडणूक घेण्याचा घाट घालत असल्याचा आरोप शेलार ग्राम पंचायतीचे सरपंच तथा आरपीआय सेक्युलरचे प्रदेश सरचिटणीस ऍड.किरण चन्ने यांनी शनिवारी सनोबर हॉल येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत केला आहे.या पत्रकार परिषदेत उपसरपंच ललित शेळके,ग्रा.सदस्या दीपिका प्रमोद भोईर,सरिता ज्ञानेश्र्वर भोईर,उषा दशरथ तपासे, सदस्य नंदकुमार जाधव, प्रमोद माळी यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेलार ग्रामपंचायती मध्ये एकूण १७ सदस्य असून त्यापैकी ९ सदस्यांनी आपल्या ग्रामपंचायत सदस्य पदाचा राजीनामा दिला होता.याबाबत कोकण आयुक्तांकडे १ जानेवारी २०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली व २ जानेवारी रोजी निर्णय देऊन तत्काळ कोकण आयुक्तांनी केवळ ९ सदस्यांनी राजीनामे दिले म्हणून ग्राम पंचायतीच्या रिक्त जागांवर फेर निवडणूक न घेता ग्रामपंचायत बरखास्त केली.कोकण आयुक्तांच्या या बेकायदेशीर व घाईघाईच्या निर्णया विरोधात आपण मा.उच्च न्यायालयात ४ जानेवारी रोजी जनहित याचिका दाखल केली असून मा.उच्च न्यायालयाने या संदर्भात स्थगिती आदेश दिले असून सध्या हे प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे.मात्र तरी देखील महसूल अधिकाऱ्यांनी शेलार ग्राम पंचायतीच्या निवडणुकीचा कार्यक्रम निव्वळ वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या दूरध्वनी आदेशावरून जुलै २०२४ मध्ये घेण्याचे आदेश पारीत केले आहेत.या बेकायदेशीर आदेशांच्या मागे स्थानिक आमदार व खासदारांचा हात असून त्यांच्या दबावाला बळी पडूनच अधिकाऱ्यांनी मा.उच्च न्यायालयाच्या स्थगिती आदेशाचा विचार न करता शेलार ग्राम पंचायतीचा निवडणूक कार्यक्रम जाहीर केला असल्याचा आरोप देखील चन्ने यांनी यावेळी केला आहे.

शेलार ग्राम पंचायत हि तालुक्यात लोकसंख्या व आर्थिक सुबत्तेच्या बाबतीत तिसऱ्या क्रमांकाची ग्राम पंचायत असून या ग्राम पंचायतींवर माझ्या सारख्या दलित सुशिक्षित वकील सरपंच असल्याचा राग काही जातीअंध लोकप्रतिनिधींमध्ये आहे.आपण गावात केलेली विकास कामे देखील काहींना राजकीय दृष्टया खुपत आहे.मला सरपंच पदावरून पायउतार करण्यासाठीच सत्तेतील आमदार व खासदार प्रयत्न करीत असून माझ्या उच्च शिक्षण घेणाऱ्या दोन मुलांवर व जवळच्या कार्यकर्त्यांना खोट्या पोलीस केस दाखल केल्या असून मला शारीरिक व मानसिक त्रास देण्याचा प्रयत्न सुरु असून माझ्या जीवाला धोका असल्याची माहिती देखील चन्ने यांनी यावेळी दिली.

सत्तेतील लोकप्रतिनिधींचा वाढता दबाव तसेच महसूल व पोलीस यंत्रणेचा बेकायदेशीर वापर व या दबाव तंत्रा विरोधात २३ फेब्रुवारी रोजी भिवंडी तहसीलदार कार्यलयावर सर्व जातीधर्मीय व सर्व भाषिक जनतेच्या सकल भारतीय समाजच्या वतीने मोर्चा आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती शेवटी सरपंच ऍड.किरण चन्ने यांनी दिली आहे.

बी.एस.पी चे गौतम लक्ष्मण वाघमारे यांची रिपाइं मध्ये असंख्य कार्यकर्त्यांसह प्रवेश

सोलापूर/प्रतिनिधीः राष्ट्रीय अध्यक्ष संघर्षनायक केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री नामदार रामदासजी आठवले यांच्या नेतृत्वाखालील व महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष लोकनेते राजाभाऊ सरवदे साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत बहुजन समाज पार्टीचे शहर उत्तर विधानसभा उपाध्यक्ष गौतम लक्ष्मण वाघमारे यांनी आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसह जाहीर प्रवेश लोकनेते आर पी आय चे प्रदेशाध्यक्ष राजभाऊ सरवदे यांच्या हस्ते गौतम वाघमारे यांचा सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्यासदर प्रसंगी सोलापूर जिल्हा सरचिटणीस-श्यामसुंदर(रवी) गायकवाड,सोलापूर जिल्हा संघटक सचिव-सिध्दार्थ बनसोडे,जिल्हा प्रसिध्दी प्रमुख-जीवन हिप्परगीकर, उत्तर सोलापूर तालुकाध्यक्ष-विठ्ठल वाघमारे,सरचिटणीस-नानासाहेब गायकवाड,संघटन सचिव-दत्ताभाऊ वाघमारे-दक्षिण सोलापूर तालुकाध्यक्ष-रामजी गायकवाड,युवक अध्यक्ष-बाबासाहेब जगताप,युवक कार्यध्यक्ष-सागर वाघमारे तसेच कोंडी येथील आकाश वाघमारे परशुराम (आबा)वाघमारे,केशव वाघमारे, सुरज जगझाप,मनोज वाघमारे,महेश (बापु)वाघमारे,आकाश साबळे,दिपक शिंदे,सतिश वाघमारे, दत्ता कांबळे,यश व्हनसुरे,मुन्ना शिंदे,बाळु वाघमारे,यांच्या सह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते

मुंबई मधील विश्व् विपस्सना पॅगोडाला आर्थिक यथाशक्ती दान करण्यासाठी आवाहन

मुंबई/विजय घनघाव :विश्र्व विपस्सना पॅगोडा (ग्लोबल विपस्सना पॅगोडा) हा मुंबईतील गोराई येथे उभारण्यात आलेला जगातील सर्वात मोठा खांब-रहित पॅगोडा आहे. बुद्धांच्या स्मृतीचिन्हांची जपणूक करण्यासाठी २००० वर्षात प्रथमच हा पॅगोडा बांधण्यात आला आहे तसेच विपस्सना ध्यान धारणेची ओळख व्हावी म्हणून याची निर्मिती केली आहे.दरदिवशी या पॅगोडाला १.५ ते २ हजार पर्यटक भेट असतात. जून २०१३ मध्ये निवडण्यात आलेल्या महाराष्ट्रातील सात आश्र्चर्यांपैकी विश्र्व विपस्सना पॅगोडा हे प्रमुख आश्र्चर्य ठरले आहे.

एकाच वेळी ८ ते १० हजार लोक बसू शकतील अशी व्यवस्था याठिकाणी आहे. पॅगोडाच्या कळसाची उंची २९ मीटर असून, भूकंपरोधक आहे. गोराईचा हा पॅगोडा, केवळ मुंबईच नाही, जागतिक आश्र्चर्याचाच नमुना आहे. कारण फक्त दगडांपासून बांधण्यात आलेला हा जगातील सगळ्यात मोठा पॅगोडा आहे. तसेच हा डोम बांधताना कुठल्याही प्रकारच्या खांबांचा, अथवा लोखंड-स्टीलचा आधार घेण्यात आलेला नाही. प्राचीन भारतीय वास्तुशैलीत ज्याप्रमाणे प्रचंड आकाराचे दगड केवळ खाचांनी एकमेकांशी जोडले जायचे, त्याचप्रमाणे दगड रचून हा डोम उभारण्यात आला आहे. विशेष म्हणजे डोमच्या मध्यभागी असलेला दगड तब्बल आठ हजार किलो वजनाचा असून तो जमिनीपासून ९० फुटांवर आहे आणि त्याला कुठल्याही प्रकारचा आधार दिलेला नाही.

प्रत्येक स्तूप किंवा पॅगोडामध्ये बुद्धाशी संबंधित काही तरी अवशेष (वस्तू, केस, अस्थि, दंत इ.) हमखास असतो. याचप्रमाणे

ग्लोबल विपश्यना पॅगोडामध्ये बुद्धांच्या पवित्र अस्थींचा अवशेष असून तो मूळ आंध्रप्रदेशातील गुंटूर जिल्ह्यातील भट्टीप्रोलु येथील बौद्ध स्तुपातील आहे. त्यामुळेच अशा वास्तूत विपश्यना करण्यासाठी अनेकजण येत असतात आणि ग्लोबल विपश्यना पॅगोडा तर, भारत आणि जगभरात प्रसिद्ध असलेले विपश्यनागुरू सत्यनारायण गोएंका यांच्या मार्गदर्शनाखालीच उभारण्यात आले आहे. त्यांच्या मार्गदर्शनानुसार येथे विपश्यनेचे वर्ग चालतात आणि हा पॅगोडा सर्व जातिधर्माच्या लोकांसाठी खुला आहे.

बोरिवली, (मुंबई) येथून पश्चिमेकडून बेस्टबसने गोराई खाडीजवळ जाता येते. आणि तेथून एस्सेल वर्ल्डकडे जाणाऱ्या लाँचने पुढचा प्रवास करता येतो... आमच्या दैनिकाच्या माध्यमातून आम्ही आवाहन करीत आहोत की या पॅगोडा ला भेट देणाऱ्या प्रेक्षकांनी आपलं यथाशक्ती आर्थिक दान देण्यासाठी पुढे यावे .कारण सदर वास्तू आणि परिसराच्या स्वच्छता आणि देखभाल दुरुस्ती करता मोठया प्रमाणात आर्थिक निधीची गरज सुद्धा तितकीच महत्त्वाची आहे..सदर पॅगोडाच्या ठिकाणची विपश्यना मनाला अधिक समाधान देऊन जाते. प्रत्येकाने आयुष्यात एकदा तरी त्याचा अनुभव घ्यायला हवा.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

मारुती बावडे यांना ग्रामीण पत्रकारितेतील द पिलर ऑफ हिंदुस्तानी सोसायटी पुरस्कार

अक्कलकोट/प्रतिनिधीः ट्रान्स एशियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री,मुंबईच्यावतीने देण्यात येणारा अत्यंत मानाचा राज्यस्तरावरील ग्रामीण पत्रकारितेतील २०२४ -२०२५ यावर्षीचा द पिलर ऑफ हिंदुस्तानी सोसायटी पुरस्कार मारुती बावडे यांना जाहीर झाला आहे.येत्या रविवारी २५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६.१५ वाजता मुंबईतील अंधेरी पूर्व येथील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाजवळील हॉटेल आयटीसी मराठा येथे एका विशेष समारंभात त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येईल.संस्थेचे अध्यक्ष डॉ.संजय भिडे यांनी ही माहिती दिली.ट्रान्स एशियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री यावर्षी आपला रौप्य महोत्सव साजरा करत आहे.त्यामुळे राज्यातील विविध मान्यवरांना राज्यस्तरीय पुरस्कार देण्यात येत आहेत.पत्रकार मारुती बावडे यांनी ग्रामीण पत्रकारितेच्या क्षेत्रात मागच्या वीस वर्षांमध्ये उल्लेखनीय असे कार्य केले आहे.पत्रकारितेच्या माध्यमातून समाजसेवेबरोबरच तळागळातील वंचितांचे प्रश्न समजून घेऊन ग्रामीण भागामध्ये सातत्याने अमुलाग्र बदल घडविण्याचा प्रयत्न त्यांनी आपल्या लेखणीच्या माध्यमातून केला आहे. सोलापूर आकाशवाणी, प्रिंट मीडिया आणि डिजिटल मीडिया या तिन्ही क्षेत्रात त्यांचा वेगळा ठसा आहे.यापूर्वीही त्यांना जिल्हास्तरावर तसेच तालुकास्तरावर विविध संस्थेचे पुरस्कार मिळाले आहेत.याची दखल घेऊनच संस्थेने या पुरस्कारासाठी निवड केली आहे. या संस्थेच्या पुरस्काराला विशेष महत्व आहे.पत्रकारिता क्षेत्रातून यापूर्वी जेष्ठ पत्रकार कुमार केतकर,डॉ.उदय निरगुडकर, प्रकाश कुलकर्णी,दिनकर गांगल आदींना हे पुरस्कार मिळाले आहेत.ट्रान्स एशियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री गेल्या १९ वर्षांपासून पुरस्कार विजेत्यांची निवड करत असते.यासाठी विविध क्षेत्रातून गुणवत्ता आणि कार्य हा एकच निकष आहे,असे डॉ.भिडे यांनी सांगितले.यावर्षी बावडे यांना हा पुरस्कार जाहीर झाल्याने त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

भारत कृषी महोत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात

शेतकऱ्यांना मार्गदर्शन, पशुपक्षी प्रदर्शन आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची शेतकऱ्यांना मिळणार मेजवानी

पंढरपूर/प्रतिनिधी :स्वर्गीय आमदार भारतनाना भालके यांच्या जयंतीनिमित्त राज्यस्तरीय भारत कृषी महोत्सवाचे आयोजन पंढरपूर येथे दिनांक २३,२४,२५,२६ फेब्रुवारी २०२४ दरम्यान येथील रेल्वे मैदान येथे करण्यात आले आहे.

बुधवारी रेल्वे मैदान येथे महोत्सवानिमित्त उभारण्यात येणाऱ्या भव्य अशा शामियान्यायची पाहणी शेतकऱ्यांचा उपस्थितीत युवक नेते भगीरथ भालके यांनी केली.यावेळी कृषी महोत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात आली

असल्याची माहिती कृषी महोत्सवाचे निमंत्रक भगीरथ भालके यांनी दिली.या महोत्सवामध्ये विशेष आकर्षण असलेला दीड टनाचा गजेंद्र रेडा,पुंगनूर गाय, पंढरपुरी म्हैस, खिलार गाय, गीर गाय, आठ

किलोचा कोंबडा व विविध प्रकारचे पक्षी शेतकऱ्यांना पाहावयास मिळणार आहेत. याचबरोबर महिलांसाठी हळदीकुंकू व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे आयोजन स्वर्गीय आमदार भारतनाना भालके फाउंडेशन पंढरपूर मंगळवेढा, सहप्रयोजक साईश्री ऍग्रो कंपनी यांच्या माध्यमातून करण्यात आले आहे. या भारत कृषी महोत्सवाचे उद्घाटन शुक्रवार दिनांक २३ फेब्रुवारी २०२४ रोजी होणार असून यादिवशी खिलार गाई प्रदर्शन, शनिवार दिनांक २४ फेब्रुवारी रोजी भव्य शेतकरी मेळावा व चर्चासत्र, रविवार दिनांक २५ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ पर्यंत डॉग शो, कॅट शोचे आयोजन करण्यात आले असून सायंकाळी ६ नंतर महिलांसाठी होम मिनिस्टर व हळदीकुंकू समारंभ कार्यक्रम, सोमवार दिनांक २६ फेब्रुवारी रोजी सकाळच्या सत्रात चर्चासत्र व सायंकाळी ६ वाजता 'मराठी पाऊल पडते पुढे' या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे .या महोत्सवाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मार्गदर्शन, पशुपक्षी प्रदर्शन आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी शेतकऱ्यांना आणि नागरिकांना मिळणार आहे.

बौद्धांच्या न्याय हक्क आणि मानवतेचे रक्षण करण्यासाठी समता सैनिक दलाची गरज : राजश्रीताई कदम

तुळजापूर तालुक्यातील केशेगावात समता सैनिक दलाचे प्रशिक्षण शिबिर संपन्न

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : समता सैनिक दलाचा सैनिक म्हणजे निडर योद्धा असावा समाजातील विषमता नष्ट करण्यासाठी कटीबद्ध असावा समाजातील नागरिकावर अन्याय अत्याचार आवहेलना गुलामगिरी अत्यंत निष्ठेने नष्ट करणारा असावा , कुठे अन्याय होत असेल तर शौर्याने लढा उभारण्या साठी प्रामाणिक प्रयत्न करणारा आसावा समाजातल्या प्रत्येक विद्यार्थी आसेल वृद्ध आसेल त्याना योग्य न्याय देत सामाजाल जागृत करण्यासाठी समता सैनिक दलाची खुप मोठी जबाबदारी आहे ती प्रमाणिक पणे पार पाडण्यासाठी प्रयत्न करणे आजच्या काळाची गरज आहे . बौद्ध व अनुसूचित जातीतील नागरिकांचे न्याय हक्क समता समानता आणि अखंडता राखण्यासाठी त्याच बरोबर समाजात शिस्त लावण्यासाठी व मानवतेचे रक्षण करण्यासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी दि १३ मार्च १९२७ ला समता सैनिक दलाची स्थापना केली , गावा गावात समता सैनिक दलाची शाखा सुरू करणे खुप आजच्या काळाची गरज आहे आसे

परखड मत भारतीय बौद्ध महासभेच्या धाराशिव जिल्याच्या कोषाध्यक्षा राजश्रीताई कदम यांनी केले .

दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया अर्थात भारतीय बौद्ध महासभा अंतर्गत समता सैनिक दलाचे प्रशिक्षण शिबीर मौजे केशेगाव ता तुळजापूर येथे संपन्न झाले यावेळी त्या प्रास्ताविक करतना बोलत होत्या. या शिबीरास प्रशिक्षण मेजर अनिल कांबळे यांनी दिले

या प्रशिक्षणात २१ महिला ४ पुरुषानी सहभाग नोंदविला . होता .कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी तालुकाध्यक्ष रामेश्र्वर चंदनशिवे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रिय शिक्षक तथा बौद्धाचार्य गुणवंत सोनवणे , संस्कार विभागाचे उपाध्यक्ष बाळासाहेब बागडे , संस्था विभागाचे सचिव कुमार ढेपे , तालुका सरचिटणीस विठ्ठल सुरते हे होते तर यावेळी उपाध्यक्ष वैभव शिरसाठ , तालुका समता सैनिक दलाचे उपाध्यक्ष उमेश पांडागळे , अंनता कांबळे , तानाजी नागटिळक , शिवराज शरद बागडे, गौतम कांबळे, कपिल कांबळे आधी जण उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विठ्ठल सुरते यांनी केले शेवटी आभार गौतम कांबळे यांनी मानले .

महसुली कर भरण्यास टाळाटाळ करणाऱ्याच्या सातबारा उताऱ्यावर महाराष्ट्र शासन असे नाव : तहसीलदार नाईकवाडे

निफाडः निफाड तालुक्यातील शेत जमीन खातेदारांनी शेतसारा अनधिकृत बिनशेती दंड वेळोवेळी सूचना व नोटिसा पाठवूनही हा दंड आणि शेतसारा न भरल्याने व सदरील खातेदारांना तलाठी कार्यालयाने वेळोवेळी नोटिसा पाठवलेला आहेत. त्यामुळे थकबाकी असणा-या खातेदारांच्या सातबारा उताऱ्यावर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १७९ अन्वये महाराष्ट्र शासन असे नाव लावण्याची कारवाई करण्याचे आदेश निफाड तहसीलदार विशाल नाईकवाडे यांनी तालुक्यातील तलाठी कार्यालयांना दिले आहेत

याबाबत दिलेल्या आदेशात म्हटले आहे की, बऱ्याच शेती खातेदाराकडे व बिगर शेती खातेदारांकडे शासनाचे शेतसारा, बिनशेती सारा, तसेच अनधिकृत बिनशेती दंड लॉन्स मोबाईल टॉवर, पेट्रोल पंप, यांच्याकडे महसुलाची रक्कम थकली आहेत त्यांना वेळोवेळी भरणा करण्या बाबत नोटिसही पाठविण्यात आल्या आहेत.मात्र वेळोवेळी खातेदार कर भरण्यास कसूर करीत आहेत. अशा सर्व कसूर करणाऱ्या खातेदारांची नावे कमी करून सातबारा उताऱ्यावर महाराष्ट्र शासन असे नाव दाखल करण्याची कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले आहे. वरील प्रकारची कार्यवाही होऊ नये यासाठी शासनास सहकार्य करावे व कारवाई टाळावी असे तलाठी कार्यालया कडून आव्हान करण्यात येत आहे.

प्रत्येक खातेदारांनी शासनाचे कर व दंड वेळेत भरणे आवश्यक आहे अन्यथा वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशाने महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ कलम १७९ अन्वये कार्यवाही करण्यात येईल – बाळासाहेब निफाडे, मंडळ अधिकारी निफाड

खातेदारांना याआधी अनेक वेळा थकबाकी वसुलीसाठी तोंडी व लेखी सुचना केल्या आहेत मात्र तरीही थकबाकी भरणा होत नाही. अशा खातेदारांबाबत आता तहसिलदार यांच्या आदेशान्वे खातेदाराच्या सातबारा उताऱ्यावर महाराष्ट्र शासनाचे नाव दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येईल.:– शंकर खडांगळे तलाठी नैताळे

अधिवेशनात जातनिहाय जनगणनेचा ठराव करा : माजी.नगराध्यक्ष शेलार

निफाडः प्रत्येक समाज आपली खोटी आकडेवारी गृहीत धरत असून याचे खरे वास्तव सर्वांच्या समोर येणे गरजेचे आहे जातनिहाय जनगणना सर्वांनाच मान्य आहे तर निर्णय घेण्यास विलंब का त्यासाठी विधानसभा अधिवेशनात जातनिहाय जनगणनेचा ठराव करा अशी मागणी निफाड नगरपंचायत चे माजी नगराध्यक्ष राजाराम शेलार यांनी तहसील कार्यालयासमोर एक दिवसीय लाक्षणिक उपोषणा प्रसंगी केली आहे

जातनिहाय जनगणना करण्याची मागणी सर्व स्तरातून होत असून उदयनराजे भोसले ,मोहन भागवत ,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, छगनराव भुजबळ, मनोज पाटील जरांगे, यांनीही केली आहे.

या मागणीला कोणाचाही विरोध नाही आठ दिवसात मराठा समाजाचे सर्वेक्षण करण्यात आल्या असून त्याच पद्धतीने जातनिहाय जनगणनेचा सर्वे केल्यास पंधरा दिवसात पूर्ण होईल, तरी मराठा आरक्षणासाठी विशेष अधिवेशन होणार असून जातनिहाय जनगणना करण्याचा निर्णय या अधिवेशनात घेण्यात यावा अशी मागणी उपोषणकर्ते निफाड नगरपंचायत चे माजी नगराध्यक्ष राजाराम शेलार यांनी केली असून याबाबतचे निवेदन तहसीलदार यांना देण्यात आले आहे,

याप्रसंगी शिवाजीराजे ढेपले, राजेंद्र मोगल, विलास मतसागर, संपत डोंगरे, नंदकुमार कापसे, आदेश सानप, रामदास व्यवहारे, प्रमोद गांगुर्डे ,बाळासाहेब कुंदे, जगन आप्पा कुटे, विलास जाधव, निवृत्ती जगताप, आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

ऑल इंडिया संपादक संघाचा २४ फेब्रुवारी रोजी पहिला वर्धापन दिन

देशभर विविध उपक्रमांचे आयोजन ; कोल्हापूर जिल्ह्याच्या वतीने मिस् क्लॉर्क येथे कार्यक्रमाचे आयोजन

कोल्हापूर/प्रतिनिधी : ऑल इंडिया संपादक संघाच्या पहिल्या वर्धापन दिनानिमित्त कोल्हापूर जिल्हा ऑल इंडिया संपादक संघाच्या वतीने ऐतिहासिक मिस् क्लार्क होस्टेल येथे सायं ४. वाजता जिल्ह्यातील विविध सामाजिक, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींच्या उपस्थितीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात येणार असल्याची माहिती संपादक संघाचे जिल्हाध्यक्ष प्रकाश कांबळे (लिंगनूरकर) यांनी दिली आहे. देशात प्रथमच स्थापण करण्यात आलेल्या ऑल इंडिया संपादक संघाचा पहिला वर्धापन दिन आहे. २४ फेब्रुवारी रोजी संपूर्ण देशभर संपादक संघाच्या माध्यमातून ऑल इंडिया संपादक संघ साजरा होत असून कोल्हापूर जिल्ह्याच्या वतीने विधायक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

संस्थापक अध्यक्ष करण बौध्द यांनी देशातील एस.एसी.एस.टी., ओबीसी संपादकांना एकत्रित करून देशातील पहिल्या ऑल इंडिया संपादक संघाची स्थापना केली. या संघाच्या माध्यमातून देशातील सर्व संपादक एकत्र जोडले गेले आहेत.या संघटनेचे उत्तरप्रदेश, बिहार, छत्तीसगड, राजस्थान, महाराष्ट्र, मध्यप्रदेश आदि देशातील जवळपास सर्वच राज्यात संघटन उभे राहिले आहे.

२४ फेब्रुवारी २०२३ ला संघाची स्थापना करण्यात आली आहे. या घटनेला एक वर्ष पूर्ण होत असून पहिला वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत आहे. या निमित्ताने विविध सामाजिक उपक्रम राबविण्याचा संकल्प महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष स्वप्निल कांबळे व कार्यकारणीने जाहीर केला आहे.

त्या अनुषंगाने कोल्हापूर जिल्ह्याच्या वतीने ऐतिहासिक मिस् क्लार्क होस्टेल येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या कार्यक्रमासाठी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हाध्यक्ष प्रकाश कांबळे (लिंगनूरकर) व सचिव दिपक कांबळे यांनी केले आहे.

गरीबांना कपडे वाटप करून शिवजयंती साजरी,पडघ्यातील तरुणांचा स्तुत्य उपक्रम

भिवंडी/प्रतिनिधीः भिवंडी तालुक्यातील पडघा येथील एका सांस्कृतिक मंचाच्या वतीने गोरगरीब नागरीकांना कपडे वाटप करुन शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

हिन्दु सांस्कृतिक मंच पडघे यांच्या वतीने झेंडा नाका येथे सोमवारी शिवजयंतीचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी पडघ्यातील होतकरू तरुण सिध्दु तेलवणे याच्या संकल्पनेनुसार संपूर्ण पडघा गावातुन जुने कपडे, साड्या गोळा करून परिसरातील विटभट्टीवरील, आदीवासी वाडीतील नागरीकांना कपडे, महीलांना साड्या व लहान मुलांना खाऊ, शैक्षणिक साहीत्य वाटप करण्यात आले .नंतर रात्री झेंडा नाका येथे हिन्दु धर्म संस्कृती या विषयावर पुरुषोत्तम सुगावकर यांचे व्याख्यान सादर करण्यात आले तर प्रोजेक्टरच्या सहाय्याने गडकिल्ल्यांची माहीती कला व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राध्यापक दिपक पोंक्षे यांनी दिली.यावेळी पडघा ग्रामपंचायतीचे माजी सरपंच व विद्यमान सदस्य अमोल बिडवी भटजी भुषण जोशी, व मंडप कॉन्ट्रॅक्टर राहुल सांवत यांचे आभार मानण्यात आले. गेल्या चार वर्षांपासून जुने कपडे गोळा करून गरीब नागरिकांना वाटप करून शिवजयंती साजरी केली जात असल्याने पडघ्यातील तरुणांच्या या आगळ्या वेगळ्या उपक्रमांबद्दल सर्वत्र त्याचें कौतुक होत आहे. या उपक्रमात सिद्धु तांबोळी ,यश तेलवणे ,रोहित कांबळे ,कौस्तुभ क्षीरसागर, हर्ष कोर,किरण तेलवणे, लौकिक पातकर, भाविक पातकर,स्वराज बिडवी,राज जगे,निखिल तेलवणे, साहिल तांबोळी, शुभम बिडवी, तेजस बिडवी , नितीशा म्हात्रे, स्वप्नाली तेलवणे, मयुरी तेलवणे,अश्विनी तेलवणे, प्रणाली बिडवी, सुनिता गंधे तर आदी सहभागी झाले होते.

विद्यार्थ्यांना यशस्वी होण्यासाठी माहिती पेक्षा ज्ञान महत्वाचे : डॉ.नितीन रणदिवे

कोल्हापूर : कोणत्याही विद्यार्थ्याला जीवनात यशस्वी होण्यासाठी माहिती पेक्षा ज्ञान महत्वाचे असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे सहा.प्राध्यापक डॉ.नितीन रणदिवे यांनी व्यक्त केले.रजपूतवाडी (ता.करवीर) येथील महात्मा जोतीराव फुले (कला व विज्ञान) कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने इयत्ता १२ वीच्या विद्यार्थ्यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण माहित होण्याच्या अनुषंगाने व स्नेहसंमेलनात '१२ वी नंतरच्या करियर संधी' याविषयावर आयोजित व्याख्यानात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी भटका व विमुक्त समाज विकास मंडळ कार्याध्यक्ष दलितमित्र व्यंकप्पा भोसले होते. यावेळी कार्यवाह प्रा.सुनील भोसले,माध्य.व उच्च माध्य.मुख्याध्यापक शिवाजी कोरवी,प्राथमिक मुख्याध्यापक कृष्णा पाटील आदी उपस्थित होते. डॉ.रणदिवे म्हणाले, शिक्षण हे समाज परिवर्तनाचे साधन आहे तसे ते व्यक्तिमत्व विकास व राष्ट्रीय विकासाचे माध्यम आहे. विद्यार्थ्याच्या व्यक्तिमत्व विकासासाठी शिक्षणाबरोबर आई-वडील,शिक्षक व समाजातील घटक महत्वाची भूमिका बजावत असतात.त्यासाठी उत्तुंग व्यक्तिमत्व असणाऱ्या महापुरुषांची पुस्तके ,आत्मचरित्रे यांचे वाचन करणे आवश्यक आहे.विद्यार्थ्यांनी यश प्राप्तीसाठी आत्मविश्र्वास,कष्ट करण्याची तयारी व अभ्यासामधील सातत्य ठेवणे आवश्यक आहे.विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर माहिती मिळविण्यासाठी करायचा की ज्ञान मिळविण्यासाठी करायचा याचा विचार केला पाहिजे.शिकून काय उपयोग हा विचार विद्यार्थ्यांनी मनातून काढला पाहिजे.कौशल्यावर आधारित रोजगारभिमुख अभ्यासक्रम विद्यार्थ्यांनी पूर्ण करणे आवश्यक आहे.भाषा व सामाजिक शास्त्रे या विद्या शाखा मधील विविध विषयांना पूरक कौशल्याधारित प्रमाणपत्र अभ्यासक्रम पूर्ण केल्यास रोजगाराची संधी मिळू शकते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा हेतूच मुळात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आहे,असे डॉ.रणदिवे म्हणाले. प्रा.सुनील भोसले म्हणाले की, आवड असलेल्या क्षेत्रातच विद्यार्थ्यांनी करियर निवडले पाहिजे.बदलत्या माहिती तंत्रज्ञानाच्या काळात माहिती आणि ज्ञान ओळखता आले पाहिजे.दलितमित्र व्यंकाप्पा भोसले म्हणले की,शिक्षक विद्यार्थ्यांना ज्ञानाची,संस्काराची शिदोरी देता असतात त्यावरच त्यांनी आपले व्यक्तिमत्व घडवायचे असते.नोकरी मिळवण्याच्या दिशेने पाऊल टाकण्यासाठी विद्यार्थ्यांनी योग्य तेच शिक्षण घेणे आवश्यक आहे. यावेळी विद्यार्थ्यांनी स्वागत गीत व मनोगते व्यक्त केली.स्वागत व प्रास्ताविक प्रा.सारिका आडके यांनी केले.

सोलापूर विद्यापीठाचा दीक्षांत सोहळा उत्साहात!

सोलापूर विद्यापीठाने जिल्ह्यातील उच्च शिक्षणाचा गुणवत्ता वाढविला : राज्यपाल

सोलापूर/प्रतिनिधीः संपूर्ण देशात केवळ एका जिल्ह्यासाठी ऐतिहासिक अशा सोलापूरच्या हुतात्मा नगरीत निर्माण झालेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने गेल्या दोन दशकात सोलापूर जिल्ह्यातील उच्च शिक्षणाचा गुणवत्ता वाढवण्यासाठी निश्चितच महत्वपूर्ण योगदान दिल्याचा गौरवोद्गार महामहीम राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती श्री रमेश बैस यांनी काढले. याचबरोबर पुढील दहा वर्षाच्या कार्यकाळात सोलापूर विद्यापीठाने प्रगती साधून देशातील पहिल्या दहा विद्यापीठांमध्ये येण्यासाठी प्रयत्नशील राहावे, असे आवाहन देखील त्यांनी यावेळी केले.

बुधवारी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा एकोणिसावा दीक्षांत समारंभ उत्साहात पार पडला. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी ऑनलाईन पद्धतीने महामहीम राज्यपाल तथा कुलपती श्री रमेश बैस हे जोडले होते. यावेळी ते बोलत होते. दीक्षांत मंडपात पार पडलेल्या प्रत्यक्ष समारंभास प्रमुख अतिथी म्हणून प्रख्यात निवृत्त प्राध्यापक, पद्मविभूषण प्रा. एम. एम. शर्मा, सोलापूरचे खासदार डॉ. जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामी, विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर, प्र-कुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा, कुलसचिव योगिनी घारे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक डॉ. मलिक रोकडे यांच्यासह विविध विद्याशाखांचे अधिष्ठता, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य आदींची उपस्थिती होती.

राज्यपाल श्री बैस म्हणाले की, सोलापूर ही हुतात्म्यांची नगरी आहे. बहुभाषिक शहर असलेल्या या नगरीने मोठे समाजसेवक, कलावंत, राजकारणी, उद्योजक घडविले. सोलापूरचे सुपुत्र असलेले दिवंगत डॉ. द्वारकानाथ कोटणीस यांनी चीनमध्ये आरोग्य सेवा देऊन देशाची मान उंचावली. अशा या शहरातील विद्यापीठातून आज विद्यार्थ्यांनी विविध पदव्या संपादन केल्या, याचा मला आनंद होत आहे. आता विद्यार्थ्यांनी समाज व देशासाठी काम करुन पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी २०४७ पर्यंत संकल्प केलेल्या विकसित भारतासाठी योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. याचबरोबर वस्त्रोद्योगाची नगरी म्हणून ओळख असलेल्या सोलापूरचे नाव जागतिक पातळीवर नेण्यासाठी विद्यापीठाने वस्त्रोद्योगाचे स्किल कोर्सेस सुरू करावेत आणि यासाठी शासनाच्या स्किल संस्थासोबत सामंजस्य करार करण्याचे आवाहनही राज्यपाल श्री बैस यांनी केले. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण देशाच्या विकासासाठी निश्चितच चांगले योगदान देणार असल्याचे ते यावेळी म्हणाले.

पद्मविभूषण प्रा. शर्मा म्हणाले की, विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाचा योग्य वापर करावा. विद्यापीठ लहान असूनही आज ४६ संशोधकांनी विविध विषयांमध्ये संशोधन केले, ही चांगली गोष्ट आहे. बेसिक सायन्समध्ये विद्यार्थ्यांनी संशोधन करावे, जे समाजाला उपयोगी पडेल. विद्यार्थ्यांनी आपले अभ्यासाचे वर्ग कधी चुकवू नये. शिक्षकांनी चांगले शिक्षण देणे आणि संशोधनावर भर देणे महत्त्वाचे आहे. मानव उपयोगी संशोधन उदा. मोबाईल, कोव्हिड वॅक्सिन असे समाज उपयोगी संशोधन करावे. शिक्षक म्हणून ज्ञानयोगी आणि कर्मयोगी व्हावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. प्रत्येक भाषा महत्त्वाची आहे, ती जपावी. आपल्या मातृभाषा मराठीवर सर्वांनी प्रेम करावे. महाविद्यालये आणि विद्यापीठाच्या विकासासाठी माजी विद्यार्थी संघटना मजबूत करणे आवश्यक आहे, असेही ते म्हणाले.

कुलगुरू प्रा. महानवर यांनी विद्यापीठाच्या विकासाचा आढावा सादर करून विद्यापीठाने गतवर्षात शिक्षण, संशोधन, कला, क्रीडा,

कौशल्य विकास आणि उद्योजकता निर्मिती या विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याचे सांगितले. आगामी वर्षात देखील सर्वांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासास पोषक असे ज्ञानदानाचे कार्य करत यशाची नवे शिखरे विद्यापीठ नक्कीच गाठेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. प्रधानमंत्री उच्च शिक्षा अभियानातून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाला शंभर कोटींचा निधी प्राप्त झाला. त्यामुळे विद्यापीठाचा सर्वांगीण विकास होईल, असेही कुलगुरू प्रा. महानवर म्हणाले.

या समारंभात एकूण ९ हजार ९४३ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आले. याचबरोबर ४६ संशोधक विद्यार्थ्यांना पीएच. डी पदवी तर ५९ विद्यार्थ्यांना सुवर्णपदके देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. समारंभाच्या प्रारंभी प्रशासकीय इमारतीपासून ते दीक्षांत मंडपापर्यंत दीक्षांत मिरवणूक निघाली. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक डॉ. मलिक रोकडे हे ज्ञानदंड हाती घेऊन मिरवणुकीच्या अग्रभागी होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. ममता बोल्ली व प्रा. तेजस्विनी कांबळे यांनी केले.

बारावी परीक्षा केंद्र उपकेंद्र बंदोबस्त ठेवला वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी.वाय.मुजावर

पंढरपूर/प्रतिनिधीः बारावीच्या परीक्षा २१ फेब्रुवारीपासून सुरू झाले आहेत त्यासाठी प्रत्येक केंद्र उपकेंद्र प्रत्येक ठिकाणी कुठलाही अनुचित प्रकार घडू नये म्हणून विद्यार्थ्यांना कॉपी करता येऊ नये व विद्यार्थ्यांचे कुठल्याही प्रकारची नुकसान होऊ नये यासाठी व त्यांना प्रत्येक केंद्रावर प्रत्यक्षपणे भेट देऊन पंढरपूर तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी वाय मुजावर यांनी पंढरपूर तालुक्यात पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी बारावी परीक्षा केंद्र उपकेंद्र येथे प्रत्यक्षपणे भेट देऊन तेथील अनुचित प्रकार कुठलाही घडू नये त्यासाठी त्यांनी बारावी परीक्षा केंद्र मातोश्री सरुबाई प्रशाला भटुंबरे येथे तसेच बारावी परीक्षा उपकेंद्र विद्या विकास प्रशाला लक्ष्मी टाकळी तालुका पंढरपूर येथे भेट दिली बारावी परीक्षा व्यवस्थित पार पडावी व कुठल्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडून येण्यासाठी अतिशय चूक बंदोबस्त पोलीस निरीक्षक टीवाय मुजावर यांनी ठेवला होता

ग्रामविकास अधिकारी आर.के.कणमुसे यांचे पंचायत समिती वतीने सत्कार

अक्कलकोट/प्रतिनिधीः वागदरी ग्रामपंचायतने रमाई आवास योजना घरकुल मध्ये तालुक्यात सर्वात जास्त घरकुल व सर्वात पहिला सर्व घरकुल पूर्ण करण्यामध्ये प्रथम क्रमांक आल्याने ग्रामविकास अधिकारी आर.के . कणमुसे यांचे आज गटविकास अधिकारी श्री सचिन खुडे यांचे हस्ते सत्कार करण्यात आला.यावेळी ग्रामसेवक संघटना तालुकाध्यक्ष अभय नीलुरे, माजी अध्यक्ष म्हेत्रे, घरकुल विभाग प्रमुख सिद्धया मठ, तालुक्यातील सर्व ग्रामसेवक व अधिकारी उपस्थित होते.

खेळाडू विद्यार्थ्यांनी क्रीडा सवलतीच्या गुणांसाठी प्रस्ताव सादर करावेत

सोलापूर/प्रतिनिधीः इयत्ता १० वी शालांत प्रमाणपत्र परिक्षेस प्रविष्ट होणाऱ्या इयत्ता ६ वी ते १० मध्ये क्रीडा स्पर्धेत जिल्हा, विभाग, राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रावीण्य मिळविलेल्या तसेच सहभाग असलेल्या खेळाडू विद्यार्थ्यांना क्रीडा सवलतीचे वाढीव गुण देण्यात येणार आहेत. क्रीडा सवलत वाढीव गुणांचा प्रस्ताव जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय येथे दि. ०५ ते २८ मार्च २०२४ या कालावधीत सादर करावेत, असे जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी कळविले आहे.

इयत्ता १० वीच्या खेळाडुने रिसिट (हॉल तिकीट) जोडणे आवश्यक आहे. प्रत्येक खेळाडूचा प्रस्ताव स्वतंत्र देण्यात यावा मेल किंवा व्हॉट्अपवर प्रस्ताव स्विकारले जाणार नाही. प्रत्यक्ष खेळाडूचा प्रस्ताव आपणास दिलेल्या नमुन्यातच व सकल मराठी मध्येच या फॉट मध्ये सॉप्ट कॉपी व हार्डकॉपी कार्यालयात जमा करावेत, तसेच संघटनेने आपण घेतलेल्या स्पर्धेचा अहवाल सादर केल्या शिवाय वाढीव गुणाचे प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत. इयत्ता १० वी पुर्वीच्या वर्षात शिकत असताना क्रीडा प्राविण्य मिळवले असले तरी क्रीडा गुणांची सवलत मिळण्याकरीता संबंधीत खेळाडू क्रीडागुण सवलत घेणाऱ्या त्या त्या शैक्षणिक वर्षात क्रीडा स्पर्धेत सहभागी होणे अनिवार्य आहे. इयत्ता १० वी मध्ये शिकत असलेल्या खेळाडू विद्यार्थ्यांने एकापेक्षा जास्त स्पर्धेत प्राविण्य प्राप्त केले असले तरी सदर खेळाडू उच्चतम अशा एकाच स्पर्धेच्या गुणांस विद्यार्थी पात्र असेल.

तालुकास्तराव प्रस्ताव सादर करावयाची तारीख- दक्षिण सोलापूर- दि.५ मार्च, उत्तर सोलापूर- दि.६ मार्च, मोहोळ- दि.७ मार्च, करमाळा- दि. १२ मार्च, मंगळवेढा- दि.१३ मार्च, सांगोला- दि.१४ मार्च, माळशिरस- दि.१९ मार्च,माढा- दि.२० मार्च, पंढरपूर- दि.२१ मार्च, अक्कलकोट- दि.२२ मार्च, बार्शी-दि.२७ मार्च, व सोलापूर शहर- २८ मार्च २०२४ रोजी प्रस्ताव सादर करावेत.

उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र इ.१० वी परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या जिल्हा, विभाग, राज्य, राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी झालेल्या खेळाडूने आपले प्रस्ताव दिनांक ५ मार्च २०२४ ते २८ मार्च २०२४ या कालावधीत जिल्हा क्रीडा कुमठा नाका टि.व्ही सेंटर समोर सोलापूर येथे वेळेत सादर करावेत असे आवाहनही जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी केले आहे.

अवैद्य वाळू वाहतूक निदर्शनास आल्यास कडक कारवाई करणार; तहसीलदार सचिन लंगोटे

पंढरपूर/राजेंद्र कोरके पाटीलः अवैध वाळू उपसा व वाहतुकी विरोधात पंढरपूरच्या महसूल विभागाची क** मोहीम अति घेतली असून तालुक्यातील तसेच चिंचोली भोसे ठिकाणी कारवाई करून अवैद्य वाळू वाहतुकीसाठी वापरण्यात येणारे जे सी बी ट्रॅक्टर व डम्पिंग व उद्योग वाळू जप्त करण्यात आल्यात असल्याची माहिती तहसीलदार सचिन लंगोटे यांनी दिली.

पंढरपूर तालुक्यातील अवैध वाळू उपसा रोखण्यास वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्या विरोधात कारवाई करण्यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार सचिन लंगोटे यांनी विविध १५ पथकाची नेमणूक केली आहे मौजे इस वयातील पंढरपूर नफा पाणी पुरवठा योजना येते दिनांक १५ फेब्रुवारी रोजी विनापरवाना वाळू उत्खनन व वाहतूक करताना एक जेसीबी जप्त केला आहे मौजे आंबे तालुका पंढरपूर येथे १९ फेब्रुवारी रोजी विनापरवाना केलेला चार ब्रास वाळू साठा जप्त केला असून संबंधित विरुद्ध पंढरपूर तालुका पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल केला आहे

तसेच दिनांक २० फेब्रुवारी २०२४ रोजी पहाटे पाच तीस वाजता सुमारा चिंचोली भोसे तालुका पंढरपूर येथून अवैधरित्या वाळू वाहतूक करताना ट्रॅक्टर व डम्पिंग ट्रॉली पकडण्यात आले आहे संबंधित वाणाच्या मालकावर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमातील तरतुदी अनुसार दंडात्मक कारवाई करण्याची कार्यवाही चालू असून सदर वाहने शासकीय धान्य गोदाम पंढरपूर येथे जमा करण्यात आली असून असलेली तहसीलदार सचिन लंगोटे यांनी सांगितले आहे

पथकात आपल तहसीलदार तुषार शिंदे नायब तहसीलदार मनोज शोत्री मंडलाधिकारी निलेश म्हणजे दीपक शिंदे विजय शिवशरण तलाठी प्रमोद खंडागळे बहुरत्न गोरे श्रीकांत कदम समीर पटेल कोतवाल अनिल सोनवणे सहभागी होते

सुसंस्काराचे मोठे विद्यापिठ म्हणजे आपले आई वडील होय : स.पो.नि.स्वप्नील लोखंडे

वागदरी/एस.के.गायकवाड : ज्या प्रमाणे राजमाता जिजाऊ ने शिवबाला घडविले त्याच प्रमाणे आपल्याला ज्यानी जन्म दिला ज्यांच्या सानिध्यात आपण लहानाचे मोठे झालो ज्यांनी आपणास योग्य असे जीवन जगण्याचे धडे दिले तेच आई आणि वडील हे खरे ज्ञानाचे विद्यापिठ आहे.असे प्रतिपादन नळदुर्ग पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक स्वप्नील लोखंडे यांनी नळदुर्ग ता.तुळजापूर येथील डॉ.आंबेडकर इंटरनँशनल इंग्लिश मेडीयम स्कूल येथे आयोजीत शिव जयंती व दहावीच्या मुलांच्या निरोप संभारंभ कार्यक्रम प्रसंगी बोलताना केले. या कार्यक्रमांच्या सुरुवातीस रयतेचे राजे कुळवाडी भुषण राजाधिराज छत्रपती शिवाजी महाराज व महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पुजन सपोनि स्वप्नील लोखंडे व कार्यकमांचे अध्यक्ष मुख्याध्यापिकासौ.कविता पाटील,संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मारुती खारवे,प्रा.डॉ. दयानंद कांबळे,महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष अरुण लोखंडे यांच्या हस्ते पुष्पहार धूप दिप प्रज्वलन करून पुजन करण्यात आले. त्यानंतर कार्यक्रमांचे प्रमुख पाहुणे स्वप्नील लोखंडे यांचा मारुती खारवे याच्या हस्ते यथोचीत स्वागतपर सत्कार करण्यात आला.पुढे बोलताना स्वप्नील लोखंडे म्हणाले की आपला महाराष्ट हा नररत्नाची खान आहे यांच मातीने छंत्रपती शिवाजी महाराज,संत तुकराम महाराज,माहात्मा ज्योतीबा फुले,राजर्षी शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर,साहीत्यरत्न आण्णा भाऊ साठे,

मॉ जिजाऊ,क्रांती ज्योती सावित्रीमाई फुले, लोकमात अहिल्यादेवी होळकर अशी महान रणरागिणी आणि रत्न दिले आहे आणि आपण पण याच महाराष्ट्राच्या मातीत जन्माला आलो आहे तेंव्हा आपण या सर्व महापुरुषांचा आदर्श आपल्या डोळ्यासमोर ठेवून आपण आपल्या जीवनात अनुकरण करून आपल्या आईवडीलांचे आपल्या देशाचे आणि आपल्या शाळेचे नाव रोषण करावे . जीवनात व्यसनाधिन न होतो चांगले शरीर कमवा चांगले शिक्षण घ्यावे असे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले.

या प्रसंगी सहशिक्षक जनक गायकवाड, विशाल महाबोले,शिवाजी जाधवर, सुरेश गायकवाड, सुरेश राजमाने, सहशिक्षिका कविता देशमुख,समिना खतीब,शबाना शेख,कलावती पवार, सदाफ शेख,रंजना घोडके, स्वाती मुळे, श्रीमती मोहरीर मँडम सह विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन इ.९ वीतील विद्यार्थीनी शिवरणी कोर,साक्षी कांबळे, सलोनी कुलकर्णी यांनी केले तर अभारप्रदर्श रोशीका हजारे यांनी केले.

नव्या पिढीच्या भविष्यात काय पडतंय आणि शेतकऱ्यांच्या खिशात काय जातंय याचा विचार करणारा नेता म्हणजे अभिजीत पाटील : शिवव्याख्याते प्रा.श्री.नितीन बानगुडे

प्रा.बानगुडे यांनी कासेगावचे महत्त्व सांगत पुरातन इतिहासाची आठवण करून दिली

पंढरपूर/प्रतिनिधी : छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त प्रतिवर्षीप्रमाणे श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन श्री.अभिजीत पाटील व विठ्ठल प्रतिष्ठानच्या माध्यमातून शिवव्याख्यानमालेचे कासेगाव येथे आयोजन करण्यात आले होते.या व्याख्यानमालेचे चौथे पुष्प प्रसिद्ध शिवव्याख्याते प्रा.श्री.नितीन पाटील बानगुडे यांच्या व्याख्यानातून समर्पित करण्यात आले. त्यांच्या अस्खलित वाणीतून शिवचरित्राचा धगधगता इतिहास ऐकताना डोळ्यात अश्रू आणि अंगावर शहरा अशी हजारो श्रोत्यांची स्थिती होती..

'छत्रपती शिवाजी महाराज' हे केवळ नाव नसून आदर्श राज्यकारभाराचा महामंत्र आहे. राजा छत्रसाल असो किंवा राजा ओहम छत्रपती शिवरायांकडून प्रेरणा घेतलेले असंख्य व्यक्तिमत्व भारतात आहेत. बलाढ्य मुघल सत्तेला पराभूतच नव्हे तर आपल्या गनिमी काव्यातून छत्रपतींनी अक्षरशः पळता भुई थोडी केली.. हा सारा इतिहास सांगताना हजारो श्रोत्यांना त्यांनी खेळवून ठेवले..शिव व्याख्यानमालेच्या आयोजनाचे पंढरपूर मध्ये सर्वत्र कौतुक होत आहे.

व्याख्यानासाठी आलेल्या सर्व व्याख्या त्यांनी देखील श्री.अभिजीत आबा पाटील यांच्या कर्तुत्वाची आपल्या अनोख्या शैलीतून दखल घेतल्याचे व्याख्यानाच्या चारही दिवसात दिसून आले..

बंद पडलेला साखर कारखाना चालू करणे असो अथवा कोरोना काळात ऑक्सीजन प्लांटच्या निर्मितीतून हजारो लोकांचे जीव वाचवण्याचे कार्य असो अभिजीत पाटील नेहमीच सर्वात पुढे राहिले आहेत, असे प्रतिपादन श्री.बानगुडे यांनी केले..

यावेळी भीमराव देशमुख मेजर, श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या व्हाईस चेअरमन प्रेमलाताई रोंगे, भारत आबा भुसे, पितांबर कापसे, माजी उपसरपंच औदुंबर निकम, सुखदेव भोसले, विठ्ठल कारखान्याचे संचालक सिताराम गवळी, संचालक सुरेश भुसे, चंद्रभागा कारखान्याचे संचालक जयनाना देशमुख, पद्मसिंह दादा देशमुख, अनिकेत देशमुख, शाहू देशमुख,माणिक गंगथंडे, जगदीश देशमुख, गणेश देशमुख, आण्णा कचकल, अनिकेत देशमुख, प्रदीप डुणे, भैय्या जाधव, भरत पाटील, मोहन ताड, बाळासो भिसे, दत्ता पांढरे, मोहन ताड, ऋषिकेश गवळी, फुगारे सर, दत्ता कुलबर्णे, बालाजी निकम, संतोष गगंथडे, महेंद्र कोळी, नितीन ताटे, नारायण शिंदे,याकार्यक्रमाचे यशस्वी नियोजन सिताराम भुसे, रवींद्र देशमुख, नानासाहेब देशमुख,संजय गवळी सर, बाबुराव नवकटे, संकेत पैलवान, नितीन ताटे, विनायक भुसे यांनी यशस्वी नियोजन करून कार्यक्रम पार पाडला.

कुसुमबाई पाटील यांचे दुःखद निधन

वागदरी : वागदरी ता.तुळजापूर येथील सदन शेतकरी विजयकुमार भगवान पाटील यांच्या अर्धांगिनी तर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी चे युवा नेते अँड. अमोल भैय्या पाटील यांच्या काकू(चुलती) सौ.कुसुमबाई विजयकुमार पाटील यांचे दि.१९ फेब्रुवारी २०२४ रोजी दुपारी १.३० वा.दरम्यान अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले.

कै.कुसुमबाई पाटील यानी आपल्या अत्यंत प्रेमळ आणि मनमिळाऊ स्वभावाने प्रत्येकांच्या ह्रदयात आपला वेगळाठसा उमटवला होता. त्या गेल्या दोन वर्षांपासून आजाराने म्रुत्युसी झुंज देत होत्या. अखेर सोलापूर येथील एका रुग्णालयात उपचारादरम्यान दि.१९ फेब्रुवारी २०२४ रोजी दुपारी १.३० वा.दरम्यान त्यांची प्राणज्योत मावळली.रात्री ठीक ९.३० वा.दरम्यान त्यांच्या पार्थिवावर वागदरी येते अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या दुःखद निधनाबद्दल समस्थ ग्रामस्थांच्या वतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. म्रुत्यु समई त्यांचे वय ५८ वर्षे होते. त्यांच्या पच्छात पति, तिन मुली,एक मुलगा,जावाई, सुन नातवंडे असा परिवार आहे.